गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक १६ वा | रविवार ०२ जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 16 | Date : 02/06/2024 blow Sunday Page 4 Price 4


# भाजप आघाडी ३५० पार; मतदानोत्तर चाचण्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हॅट्रिकचा अंदाज

कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारक येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सुरू केलेली ४५ तासांची ध्यानधारणा शनिवारी पूर्ण केली.पूर्ण आत्मविश्र्वासाने मी सांगतो की मतदारांनी विक्रमी संख्येने राष्ट्रीय लोकशाही आघाडीची पाठराखण केली आहे. विरोधकांना जनतेने पूर्णपणे नाकारले आहे. केवळ मोदी द्वेषावर त्यांचा प्रचार आधारित होता. ज्यांनी रालोआला मतदान केले त्यांचे मनापासून आभार. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान



रालोआ इंडिया इतर

इंडिया न्यूज ३७१ १२५ ४७डी–डायनॅमिक्स

जनकी बात ३६२–३९२ १४१–१६१ १०–२०

न्यूज नेशन ३४२–३७८ १५३–१६९ २१–२३

रिपब्लिक भारत ३५३–३६८ ११८–१३३ ४३–४८

इंडिया टुडे ३४८ १६७ ०६

चाणक्य ४०० १०७ २९

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी साडेतीनशेहून अधिक जागांवर विजय मिळवून तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करेल, असा अंदाज सर्वच मतदानोत्तर चाचण्यांमधून व्यक्त करण्यात आला आहे. सलग दहा वर्षे सत्तेत राहूनही भाजपविरोधी वातावरण नसल्याचा आणि विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीचा फारसा प्रभाव निकालांवर पडणार नसल्याचा अंदाज या चाचण्यांतून व्यक्त झाला आहे. नरेंद्र मोदी यांनीही या अंदाजांवर प्रतिक्रिया देताना 'संधीसाधू' आघाडी जनतेशी नाळ जोडण्यात अपयशी ठरली, असे म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदान शनिवारी सायंकाळी पार पडल्यानंतर उघड झालेल्या सर्व संस्थांच्या मतदानोत्तर चाचण्यांनी रालोआला सरासरी ३५०हून अधिक जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. विरोधी पक्षांची इंडिया आघाडी १२५ ते १५० पर्यंतचा आकडा गाठेल, असे या चाचण्यांत म्हटले आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत सरासरी १३ मतदानोत्तर चाचण्यांनी रालोआला ३०६ आणि काँग्रेसप्रणित संपुआला १२० जागांचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात भाजपने ३०३ तर रालोआने ३५३ जागांवर विजय मिळवला होता. त्या विजयापेक्षाही अधिक जागा यंदा भाजपला मिळतील, असे यंदाचे अंदाज आहेत. येत्या चार जूनला मतमोजणीनंतर निकालाचे चित्र स्पष्ट होईल. भाजपच्या सलग तिसऱ्या विजयामध्ये हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यांतील घवघवीत यश प्रभावी ठरेल, असा मतदानोत्तर चाचण्यांचा अंदाज आहे. मात्र, त्याबरोबरच दक्षिण भारतात कर्नाटकखेरीज तमिळनाडू, आंध्र प्रदेश आणि केरळ या राज्यांमध्ये भाजप नेत्रदीपक यश मिळवेल, असा सूर व्यक्त करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदा दक्षिण भारतातील प्रचारावर विशेष लक्ष दिले होते. त्याचा भाजपला फायदा होईल, असा अंदाज चाचण्यांमधून व्यक्त करण्यात आला आहे.

। पान २ वर

# 'सरकारी नोकरीमध्ये पदोन्नती मिळणे हा अधिकार नाही', सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**



सरकारी नोकरदारांना पदोन्नती देण्यासंदर्भात राज्यघटनेत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नोकरदारांना पदोन्नती देण्याचे निकष, स्वरूप आणि त्यासाठी काय पात्रता असावी, हे ठरविण्यासाठी कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ स्वतंत्र आहे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सदर निकाल दिला आहे. भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नती हा त्याचा अधिकार असल्याचे सांगू शकत नाही, कारण संविधानात पदोन्नतीबाबत कोणताही उल्लेख नाही. खंडपीठाने पुढे म्हटले की, कायदेमंडळ किंवा मंत्रिमंडळ पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी निकष आणि त्यासंबंधीची प्रक्रिया ठरवू शकतात. नोकरीचे स्वरुप आणि उमेदवाराचे काम यावर पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्यासाठीची नियमावली केली जाऊ शकते. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण हे सक्षम उमेदवारासाठी योग्य आहे किंवा नाही, याचे पुनरावलोकन न्यायालय करू शकत नाही.गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांचा निवडीवरून पदोन्नतीचा वाद सुरू झाला. हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना खंडपीठाने यावर टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे सरकारी विभागातील पदोन्नतीशी संबंधित अनेक विषयात स्पष्टता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी पदोन्नतीच्या विषयावरून सरकारी कर्मचारी न्यायालयात जात असतात.

निकालाचे लिखाण करत असताना न्या. पारडीवाला यांनी म्हटले की, अनेक ठिकाणी वर्षानुवर्ष नोकरी करणारे कर्मचारी संस्थेप्रती असलेल्या आपल्या निष्ठेचे फळ मिळण्याची वाट बघत असतात. सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीच्या विषयात वेळोवेळी हेच सांगितले आहे की, पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठतेसह कामाचा दर्जाही पाहिला पाहीजे.

पदोन्नती संदर्भात याआधीही अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झालेली आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळण्याबाबतचे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यास राज्ये बांधील नाहीत आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा दावा करण्याचा कोणताही मूलभूत अधिकार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते.

# ..म्हणून दिल्लीत ५२.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दोन दिवसांपूर्वी दिल्लीतल्या मुंगेशपूर येथे ५२.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. हे देशातलं सर्वात उच्चांकी तापमान असल्याच सांगण्यात आलं होतं. मात्र, याबाबत आता हवामान विभागाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. सेन्सरमधील त्रुटीमुळे हे तापमान वाढल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.




२९ मे रोज मुंगेशपूर हवामान केंद्राने दुपारी २.३० वाजता ५२.९ अंश सेल्सिअस तापमानी नोदं केली होती. या वाढलेल्या तापमानाची नोंद ही सेन्सर किंवा स्थानिक घटकातील त्रुटीमुळे असावी, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला होता. तसेच या तापमानाची अचूकता । पान २ वर

# सिंदखेडराजा तालुक्यातील वाळू माफिया जोमात; महसूल विभाग कोमात?

## अर्थ पुर्ण व्यवहारातून साठेगांव दुसरबिड, ताडशिवणी येथून रात्रंदिवस रेती उत्खनन सुरू

**बुलढाणा/ राहुल साबळे**

सिंदखेडराजा तालुक्यातील खडकपूर्णा नदीपात्रातून कोट्यावधी रुपयाची अवैध रेती उत्खनन महसूल विभागाच्या आशिर्वादाने आर्थिक देवाणघेवाण करून अवैध रेती उत्खनन सुरू असून रेती तस्कर जोमात तर महसूल विभाग कोमात असल्याचे चित्र तालुक्यात सद्या सर्रास दिसत आहे सिंदखेडराजा तालुक्यातील जिवनवाहीनी असलेली खडकपूर्णा नदीमाय रेती तस्करांमुळे खडकाळ झाली असून रेती उत्खननामुळे



परीसरातील नागरीकांना भिषण पाणीटंचाई चटका सोसावा लागत आहे या खडकपूर्णा नदीपात्रात अश्मयुगीन रेती मानवी तस्करांकडून नामशेष होण्याच्या मार्गावर असून अवघ्या दोन वर्षांत सदर रेती नामशेष होऊन नावालच खडकपूर्णा माय राहील एवढे नक्की सदर खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध रेती उत्खनन करण्यासाठी महसूल विभागाच्या लाचखोर अधिकारी यांनी पुढाकार घेतल्याने ही खडकपूर्णा माय खडकाळ बनली आहे आज रोजी तालुक्यातील साठेगाव दुसरबिड,ताडशिवणी येथील खडकपूर्णा नदीपात्रातून रात्रंदिवस रेतीची अवैध उत्खनन जेसीबी व पोकलॅंड मार्फत सुरू असून सदर रेती उत्खनन व वाहतूक महसूल विभागाच्या अर्थ पुर्ण व्यवहारातून सुरू असल्याची चर्चा तालुक्यात । पान २ वर

# दूषित पाण्याच्या तक्रारी वाढल्या; पालिका प्रशासनाचा पाणी शुध्दतेचा निर्वाळा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरात नळावाटे अशुध्द, गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याच्या



तक्रारी वाढत चालल्याच्या पार्श्र्वभूमीवर एका तक्रारदाराच्या तक्रारीशी संबंधित पालिका प्रशासनाने घेतलेल्या पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यावर आलेला अहवाल सारे काही आलबेल असल्याचा स्वरूपाचा आहे. त्यामुळे अशुध्द, गढूळ आणि काळयाच्या पाण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले नागरिक आश्र्चर्यचकित झाले आहेत. पाणी नमुने तपासणीच्या पारदर्शकतेविषयी शंका उपस्थित केली जात आहे. शहरात अनेक ठिकाणी महापालिकेमार्फत । पान २ वर

# अक्कलकोट उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू उपसा जोरात सुरु



**दोन पोलिस ठाण्याच्या हद्दी : उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून रात्री ११ ते पहाटे वाजेपर्यंत वाळूची वाहतूक होते. विशेष म्हणजे ज्या वाहनांतून ही वाळूची वाहतूक होते त्यापैकी बहुतेक वाहनांवर नंबर प्लेट नसल्याने एखादा अपघात झाल्यास ते वाहन शोधणे कठीण आहे. या विनानंबरच्या वाहनांकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असले तरी आरटीओचे अधिकारीही कानाडोळा करत असल्याचे यावरून दिसून येते.**

**वाळूचे अवैध साठे :सध्या वाळू बंद असल्याचा दावा तहसील प्रशासन करत आहे. तरीदेखील तालुक्यातील भिमा–सीना, बोरी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचे साठे कसे..? याचे उत्तर मात्र प्रशासन देताना दिसत नाही. एखाद्या वेळी ज्या वाळू तस्कराने हप्ता वेळेवर दिला नाही त्या वाहनावर कारवाईसाठी अधिकारी त्या वाहनाच्या मागे लागतात. परिणामी वाहने भरधाव चालवून एखाद्या वसाहतीत वाळू टाकून पळ काढतानाचे प्रकार वाढत असल्याचे दिसून येत आहे.**

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

तालुक्यातील उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू उपसा जोरात सुरु असल्याने चढ्या दराने विक्री होत असून, शासनाने वाळू विक्री विषयी काढलेला अध्यादेश बासणात गुंडाळल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.अवैध वाळू व्यवसाया करिता जिल्ह्यातच अक्कलकोट तालुक्याचे नांव अग्रेसर आहे. तालुक्यातील भिमा–सीना, बोरी नदीतून भरमसाठ वाळू उपसा झाल्याने नदीच्या पत्रात बदल होऊन पर्यावरणास मोठा धोका होऊन ही याबाबत महसूल व गृह विभागाकडून बघ्याची भूमिका घेतली जात आहे. केंद्राच्या पर्यावरण व हरित लवादा कडून ताशेरे ओढून ही अवैध वाळू व्यवसाय थांबलेला नांही.

अवैध वाळू व्यवसायाच्या विरोधात आजवर दोन्ही पोलीस ठाण्याकडून ठोस कारवाई झालेला नांही. दरम्यान प्रशासनाने अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष सात पथकांची टीम तयार केली. पथकांनी महिनाभरात केवळ चार ते पाच अवैध उपसा करणाऱ्या वाहनांवरच कारवाई केली, मात्र परिसरातून दररोज सुमारे लाखो ब्रास वाळूचा अवैध उपसा होत आहे. हा अवैध उपसा आजमितीस तरी प्रशासनाला रोखणे शक्य असल्याचे दिसत नाही.

या अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाहनांवर कारवाई कोण करणार, असा सवाल निर्माण होत आहे. दिवसा नजरेत येऊ नये म्हणून वाळू वाहतूकदारांकडून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर लाखो ब्रास वाळूचा अवैध उपसा सुरू आहे. तालुक्यातील विविध ठिकाणांहून सध्या मोठ्या प्रमाणात शेकडो ट्रक, हायवा तसेच ट्रॅक्टर आदींच्या साह्याने नदीपात्रातून वाळू काढली जाते. रात्रीतून इतर वाहनांनी वाळूची वाहतूक होते. अवैध वाळू उपसा होत असेल तर तहसीलच्या वाळूविरोधी पथकाने या वाहनांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु हे पथक या गोष्टींकडे कानाडोळा करत असल्याची सामान्यांची ओरड आहे. दररोज शेकडो वाहनांतून वाळू उपसा होत आहे. तालुक्यातील नद्यातील लाखो ब्रास वाळूचा अवैध उपसा केल्याने नद्यांचे पात्र बदलले आहेत.

तालुक्यातील वाळूची तस्करी करणाऱ्या विरोधात अनेक गुन्हे दाखल असताना ही त्यांच्यावर तडीपारचा प्रस्ताव न करिता अन्य गुन्ह्यातील गुन्हेगारांना नुकतेच तडीपार करण्यात आलेले आहे. सदर वाळू तस्कर्यावर तडीपार बरोबरच मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे. याबाबत विभागीय आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र कोल्हापूर, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, प्रांताधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी लक्ष घालून त्वरित कारवाई करण्याची अधिसूचना जारी करण्याची मागणी तालुक्यातून होत आहे.

## संपादकीय

### काहीच सोयरसुतक नाही....

आज बेरोजगारी, वाढती बेरोजगारी, बुडालेले उद्योग, पराकोटीची महागाई; महाग झालेले शिक्षण अशा अनेक मूलभूत प्रश्नांची चर्चाच होत नाही. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतप्रवाह वळवण्याचे मनसुबे जनता ओळखून आहे. सतत काही ना काही उपद्रव होईल, वादग्रस्त मुद्दे चर्चेत येतील व लोकांची शक्ती व्यर्थ खर्ची होईल, अशा घटना घडवत ठेवायचा निर्णय सत्ताधाऱ्यांनी घेतला आहे. मंगळसूत्र, म्हैस, मछली, राम मंदिर, मोदी की गॅरंटी, मुस्लिमांची वाढती लोकसंख्या, भटकती आत्मा, सॅम पित्रोडा, अदानी, अंबानी टेम्पो भरून काला धन कॉंग्रेसला देत आहे, अशा मुद्द्यांवर मतदारांची दिशाभूल केली जात आहे. सगळ्यात गंभीर म्हणजे हे मुद्दे स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे करत आहेत आणि पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा लयाला घालवत आहेत. हुकूमशाही राज्यसत्तेचा विचार केल्यास असे दिसते की, शी जिनपिंग (चीन), व्लादिमीर पुतीन (रशिया), रेसेप एर्दोगान, या एकाकी नेत्यांच्या जोडीला मोदींचा गुणविशेष आता लपून राहिलेला नाही. उपरोल्लेखित एकाही नेत्याच्या देशात आर्थिक व सामाजिक व्यवस्था ठीकठाक नाही. सर्वांनी सत्तास्थान पटकावताच आपल्याला हवे तसे घटनात्मक बदल केले आणि विरोधकांचा आवाज असा दडपला की, ते पुन्हा उठणारच नाहीत. मोदीसुद्धा तसेच करत आहेत. कुठल्याही विशिष्ट व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या आणि कुटुंबीयांच्या हाती प्रदीर्घ काळ सत्तेचे केंद्रीकरण हे त्या-त्या देशातील राज्यसंस्थेच्या ऱ्हासाचे कारण बनत असते. श्रीलंकेचे उदाहरण आपल्या समोरच आहे. अनिर्बंध सत्तेचा हव्यासच संबंधित व्यक्तीमधील विवेकाला मातीत गाडत असावा. आम्हाला धार्मिक टोळीत सक्रिय राहण्यात मजा वाटायला लागलीय का?, चुकीचा इतिहास जरी आमच्या ताटात कुणी वाढला तरी, त्याचे घास आपल्या मेंदूत भरण्यात आम्हाला मजा वाटायला लागलीय का? आपला भारत भविष्यात महान होणार आहे. विश्वगुरू होणार आहे, असे आम्ही निवडलेले सरकार बिंबवत आहे; पण तो कसा महान करणार आहात? हे विचारण्याची तीळभरही हिंमत आमच्यात नाही किंवा एक तर आमची बुद्धीच चालत नाही. भारतात पूर्वी किती भ्रष्टाचार होता आणि मागील ७० वर्षांत कसं काहीच झालेलं नाही आणि आता मात्र या सरकारने मागील दहा वर्षात भारताला कसं सोने की चिडिया केलेला आहे अशा काल्पनिक विकासाच्या गोष्टी ऐकून रात्री झोप यायला लागली आहे, याच झोपेत आमचा देश भांडवलदारांना आंदण देऊन टाकला असून आम्हाला त्याचे काहीच सोयरसुतक नाही.

# बालाजी अमाईन्सच्यावतीने सी.एस.आर.अंर्तगत मुळेगाव ग्रामपंचायत येथिल तातडीची पाणीपुरवठा योजनेचा व जगदंबा नगर ते सवितानगर येथिल सिमेंट कॉंकिट रस्त्याचे लोकार्पण कार्यक्रम संपन्न

द.सोलापूर/प्रतिनिधीः मुळेगाव ग्रामपंचायत येथे दामलेवस्ती, उष्र्कषनगर, महात्मा फुले नगर या भागात बोअर वर पाणीपुरवठा होतो दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याची समस्या होत असते. गावातील सदस्य, सरपंच आणिउपसरपंच शिवराज जाधव यांनी याभागास पाणीपुरववठा करणेकरीता बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाकडे पाण्याच्या ट्रॅन्करची मागणी केली. बालाजी अमाई न्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी व संचालक मंडळानी या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे ठरवले. गावाच्या जवळच दामलेवस्ती येथिल भागात असलेल्या पाणीपुरवठा विहीरीवरून ६०० मीटर पाईप लाईन केल्यास दामलेवस्ती, उष्र्कष नगर, फुलेनगर याभागाची पाण्याची समस्या पुर्ण मिटेल या उद्देशाने हया कामास व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी व संचालक मंडळानी त्वरीत मंजुरी दिली .




बालाजी अमाईन्सच्या तातडी ची पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे व बालाजी स्पेशालिटी केमिकल्स च्या वतीने जगदंबानगर येथे करण्यात आलेल्या सिमेंट कॉंकिटच्या रस्त्याचे आज १.०६.२०२४ रोजी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांच्या हस्ते येथे पाण्याच्या टाकीचे पुजन करून व नारळ वाढऊन या कामाचे लोकार्पण करण्यात आल या प्रसंगी व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांनी बालाजी अमाईन्सच्यावतीने सोलापुर व धाराशिव जिल्हयातील सी.एस.आर अंर्तगत विविध कामाची माहीती नागरीकांना सांगितली बालाजी अमाईन्सच्यावतीने पाणी टंचाई काळातयंदाच्यावर्षी कासेगाव येथिल पाणीपुरवठा विहीरीचे खोलीकरणाचे काम तसेच धाराशिव जिल्हयातील तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव येथिल पाणीपुरवठा विहीरीचे खोलीकरणाचे काम केल्यामुळे यंदाच्यावर्षी हया दोन्ही गावाचा पाण्याचा प्रश्र्न मिटला जगदंबानगर येथिल सिमेंट कॉंकिटच्या रस्त्याचे संचालक राम रेडडी यांचे हस्ते नारळ वाढऊन पुजन करण्यात आले

तातडीची पाणी पुरवठायोजने समाविष्ठ कामे.

१ ग्रामपंचयतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीवर ५ एच.पी पाणबुडी पंप. २ ६३ मी.मी. पीव्हीसी उर्ध्वनलिका (पाईपलाईन) ५०० मीटर ३ ३००० लिटर क्षमतेच्या ३ तीन पाण्याच्या टाक्या बालाजी स्पेशालिटी केमिकल्स लि यांचेवतीने मुळेगाव येथिल जगदंबा नगर ते सवितानगर पर्यंत ५६० मीटर सिमेंट कॉंकिट रोड करण्यात आला.या कार्यकमास बालाजी अमाईन्स चे सी.एस.आर प्रमुख मल्लिनाथ बिराजदार, मुळेगावचे सरपंच सविता शिवराम भोसले, उपसरपंच शिवराज दाजी भोसले,, ग्रामपंचायत सदस्य मंगल भुजंग खरात, अजमेरा, ग्रामसेवक रमेश गायकवाड , नलपती अपपा बनसोडे माजी सभापती, राहुल जाधव, शिवराम भोसले, संतोष जाधव, भारत कोळेकर, मल्लिनाथ माळी, बालाजी अमाईन्सचे प्रसाद सांजेकर, बसवराज अंटद, मल्लिकार्जुन अरकाल, उमेश मामडयाल तसेच दामलेनगर व जगदंबानगर येथिल नागरीक उपस्थित होते.

# जैन इरिगेशन आणि शेतकरी यांचे अतूट नाते : विक्री अभियंता राहुल भालेराव



**बुलढाणा/ राहुल साबळे**

बायगांव बु... स्थानिक बायगांव बु येथील हिवाशी तसेच शुभम ट्रेडर्स अँड मशिनरी मलकापूर पांग्रा चे वितरक गजानन शंकरराव नागरे यांच्या प्रयत्नातून व जैन इरिगेशन यांचे संयुक्त विद्यमाने जैन इर्रीगेशन चे अत्याधुनिक तंत्रज्ञान व त्याचे फायदे आपल्या गावातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचावे या उद्देशाने बायगाव बु येथे शेतीशाळा आयोजित केली होती. आजपर्यंत जैन आपल्या दर्जेदार व नवनवीन तंत्रज्ञान याचे माध्यमातून शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून अनेक सूक्ष्म सिंचनाचे उत्पादने शेतकऱ्यांपर्यंत पोहचवत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा व पाणी यांची बचत होण्यास मदत होतं आहे. स्थानिक भगवान बाबा मंदिरातील सभामंडपात या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जैन इरिगेशन चे प्रमुख वक्ते तसेच विक्री अभियंता श्री. राहुल भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी शेती, शेतकरी व जैन इरिगेशन यांचे नाते अतूट आहे आणि जैन कंपनी ने आजवर आधुनिक शेतीसाठी भरीव असे योगदान दिले आहे असे मत व्यक्त केले. तसेच सूक्ष्म सिंचन पद्धती तसेच त्याचा योग्य वापर व त्याची निगा व देखभाल याविषयी चर्चा केली.

यावेळी गजानन सानप ( तंटामुक्ती अध्यक्ष ), भगवान राठोड (मा. ग्रा. पं. सदस्य ), रवी मांटे डॉ. हरिभाऊ नागरे, जानीकराव वनवे, बाबुराव गिरी, रामेश्र्वर थोरवे (उपाध्यक्ष ग्रा. से. सो), दिलीप वनवे (पत्रकार ),कैलास आघाव (ग्रा. पं. सदस्य ),देवानंद कायंदे, राजू खरात ( उपाध्यक्ष शा.व्य.स) निलेश वायाळ पाटील, सुधाकर खरात, शिवाजी आघाव, भिवा केदार,रितेश केदार, गजू वाघ, गजानन नागरे, यांसह मोठया प्रमाणात शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शंकर गिरी यांनी केले.

पान १ वरुन

## भाजप आघाडी ३५० पार...

उत्तर प्रदेशमध्ये भाजपचा दबदबा

उत्तर प्रदेशातील ८० जागांपैकी रालोआ किमान ६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त होत आहे. हा आकडा गतवेळच्या आकड्याच्या जवळपासच राहील, असे चित्र आहे. त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या लोकप्रियतेच्या जोरावर राज्यातील भाजपची पकड मजबूत असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

दक्षिणेत भाजपची मुसंडी

गेल्या निवडणुकीत दक्षिणेत भाजपला केवळ २९ जागा जिंकता आल्या होत्या. तुलनेत मतदानोत्तर चाचण्यांमध्ये २०२४ मध्ये भाजप कर्नाटकमध्ये गेल्या वेळच्या २५ जागांच्या तुलनेत तीन ते चार जागा गमावेल असे भाकित वर्तवण्यात आले आहे. मात्र तामिळनाडू, केरळ, तेलंगण व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये भाजपची कामगिरी चांगली राहील अशी शक्यता आहे. विशेषत: केरळ तसेच तामिळनाडूत भाजपचे आपले खाते उघडेल असे संकेत या चाचण्यांतून मिळत आहेत. केरळमध्ये यश मिळवण्यासाठी भाजपची अनेक वर्षांपासून रणनिती यंदा कामी येताना दिसत आहे.

## ..म्हणून दिल्लीत ५२.९..

पडताळण्यासाठी एका समितीची स्थापना देखील करण्यात आली होती.

दरम्यान, या समिती आता यासंदर्भातील अहवाल सादर केला आहे. त्यानुसार २९ मे रोजी झालेल्या तापमानीची नोंद सेन्सरमधील त्रुटीमुळे झाल्याचं स्पष्ट झाले आहे. या त्रुटीमुळे हे तापमान ३ अंशांनी वाढल्याचं या अहवालात सांगण्यात आलं आहे. तसेच २९ मे रोजी दिल्लीतील कोणत्याही हवामान केंद्राने ५० अंशाच्या वर तापमानाची नोंद केली नाही, असं स्पष्टीकरणही या अहवालातून देण्यात आलं आहे. या दरम्यान, सर्वाधिक तापमान हे ४५ ते ४९.१ असं सेल्सिअस राहिल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. महत्त्वाची म्हणजे असा प्रकारची घटना यापुढे होऊ नये. यासाठी योग्य त्या उपाय योजना केल्या असल्याचेही हवामान विभागाने म्हटलं आहे.

## सिंदखेडराजा तालुक्यातील..

सुरू आहे बुलढाणा जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रात भेट दिली त्यानंतर तर रेती तस्कर जोमात तर महसूल विभाग कोमात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे सिंदखेडराजा तालुक्यातील महसुल विभागात कठोर व कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे, तहसिलदार प्रविण धानोरकर यांनी काही दिवसांपूर्वी तालुक्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतूकीला मोठ्या प्रमाणात लगाम घातला असतांना आता वरील गावातून रात्रंदिवस खुलेआम अवैध उत्खनन व वाहतूक कोणाच्या आशिर्वादाने सुरू आहे हा यक्षप्रश्र्न तालुक्यातील जनतेला पडला आहे नुकतेच निमगाव वायाळ येथील महिला सरपंच यांनी महसूल विभागाला कंटाळून आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर सदर घाटाचे मोजमाप झाले मात्र सदर मोजमाप चा अहवाल महसूल विभाला प्राप्त झाला नसल्याने अद्याप कुठलीही कारवाई करण्यात आली नाही तर या मोजमापात सहा लाख अवैध उत्खनन झाल्याची सार्वजनिक बांधकाम विभागात चर्चा असल्याने अनेक राजकीय नेते हा अहवाल बदलण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे

## दूषित पाण्याच्या तक्रारी ..

नळावाटे पुरवठा होणा-या पाण्याच्या शुध्दतेविषयी तक्रारी वाढत आहेत. भवानी पेठेसह मराठा वस्ती, कस्तुरबा भाजी मंडई परिसरात अशुध्द, गढूळ, दुर्गधीयुक्त काळे पाणी नळातून मिळत असल्याचा अनुभव आल्यानंतर भाजपचे स्थानिक माजी नगरसेवक अनंत जाधव यांनी त्रस्त नागरिकांसह महापालिकेत येऊन उपायुक्त संदीप कारंजे यांना अशुध्द व गढूळ पाणी असलेल्या दोन बाटल्या भेट दिल्याची घटना ताजी असतानाच भवानी पेठेतील घोंगडे वस्ती परिसरात गढूळ, दुर्गधीयुक्त दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत सुनील कोडगी या जागरूक नागरिकाने केलेल्या तक्रारीवर पालिका प्रशासनाने संबंधित भागातील दूषित पाण्याचे नमुने घेऊन तपासले. यात संबंधित नमुन्यातील पाण्यामध्ये एमपीएन काऊंट आणि क्लोरीनचे प्रमाण समाधानकारक असल्याने हे पाणी पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. या अहवालाबाबत तक्रारदार सुनील कोडगी यांनी आश्र्चर्य व्यक्त करीत, महापालिकेने नमुन्यादाखल घेतलेल्या दूषित पाण्यामध्ये अळ्या सुध्दा होत्या. तरीही महापालिका प्रशासनाने पाणी दूषित नसल्याचा आणि पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा दिल्यामुळे हेच पाणी नागरिकांनी मुकाट्याने प्यावे काय,असा सवाल उपस्थित केला आहे.



# १० वी १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मुला-मुलीचा गुणगौरण सोहळा

**उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे**

आज दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त यानी चला वळू या ध्येयाकडे या संकल्पनेतून १० वी १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलीचा गुणगौरण सोहळा उल्हासनगर महापालिकेत पार पडला. सदर सोहळ्यात खालीलप्रमाणे उपस्थिती होतो.

मुख्य अधिकारी पिंजारी, अतिरिकत् आयुक्त जमीर लेंगरेकर, सहा. संचालक, नगररचना ललीत खोब्रागडे, उप-आयुक्त किशोर गवस, डॉ. सुभाष जाधव, सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, महापालिका सचिव प्राजक्ता कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, उप लेखा अधिकारी श्रीम. निलम कदम, मुख्य बाजार निरीक्षक विनोद केणे, मुख्य अग्निशामन अधिकारी बाळू नेटके, विधी अधिकारी, राजा बुलानी, क्रीडा अधिकारी शांताराम चौधरी, उद्यान अधिक्षक दिप्ती पवार, पर्यावरण विभाग प्रमुख , विशाखा सावंत , सहायक आयुक्त ,गणेश शिंपी, दिव्यांग विभाग प्रमुख राजेश घनघाव इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.या गुणगौरव सोहळ्यात मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांचेमार्फत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उपजिल्हाधिकारी, सागर धनाजी मुळीक, व ए.बी.डी.ओ. दिक्षा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांची मुलगी अरिबा जमीर लेंगरेकर ही १० वीमध्ये ९०% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल, सहा. संचालक नगररचना ललीत खोब्रागडे यांचा मुलगा मध्यांश ललीत खोब्रागडे हा १० वीमध्ये ९७% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल, तसेच सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे यांची मुलगी सौम्या मनिष हिवरे ही १२ वीमध्ये ९५% गुणांनी उत्त्रीर्ण झाल्याबद्दल महापालिका आयुक्तांनी कौतुक केले. तसेच इतर अधिकारी कर्मचारी यांच्याही मुलांचे परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदर गुणगौरव सोहळ्यास महापालिका आयुक्तांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर. यांनी मांडली. व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी केले शेवटी कार्यक्रमाची सांगता उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांनी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# काळया मातीत मातीत, रस्ता बांधतो.. बालदेव चांभई रस्त्यावरील प्रकार..

## गावकरींचं सपान फुलवण्याच्या नावावर नफेखोरांचं दुकान चालवण्यात येत आहे

**मंगरूळपीर/गौरवकुमार इंगळे**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था अंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे माध्यमातून दोन कोटी रुपये खर्च करून बालदेव ते चांभई रस्त्याचे बांधकाम सुरू आहे सदर बांधकामांमध्ये धक्कादायक गोष्ट अशी निदर्शनास आली की रस्त्याचा बहुतांश भाग हा काळया




भुसभुशीत मातीवर बनवल्या जात आहे. सदर ब्लॅक कॉटन सॉईल चे थरावर हा डांबरी रस्ता बनवण्यात येत आहे या रस्त्याच्या दोन्ही बाजूला खोल नाल्या तयार केल्या असून भविष्यात नाली मध्ये पावसाचे पाणी शिरल्यास रस्त्याच्या खाली काळया मातीच्या थराला हानी होऊन रस्ता वाहून जाण्याची दाट शक्यता आहे. सदरील शंकेचे समाधान मिळण्यासाठी कनिष्ठ अभियंता उपविभागीय अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांना संपर्क करून विचारणा केली असता त्यांचे स्तरावरून कुठलेही लेखी उत्तर प्राप्त झाले नाही. परंतु रस्ता चांगलाच होत आहे की काळी माती दबून अजून मजबूत होईल अशी उडवा उडवीची तोंडी उत्तरे कनिष्ठ अभियंत्यांनी दिले मात्र सदर उत्तरे लेखी स्वरूपात मागितल्यावर पत्रावर कुठलाही प्रतिसाद महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था वाशिम यांचे कार्यालयातून प्राप्त झाला नाही. रस्त्याच्या अंदाजपत्रकामध्ये सब ग्रेड सॉइलवर रस्त्याचे बांधकाम होणे अपेक्षित आहे ही सबग्रेड सोईल काळी भुसभुशीत माती असू शकते का? या शंकेचे मात्र समाधान अद्याप करण्यात आले नाही.

टक्केवारीच्या संभाव्य प्रघाताचे अनुकरण करत असताना प्रशासनाकडून कंत्राटदाराचे संरक्षण केले जात असल्याच्या घटना मंगरूळपीर तालुक्याला नवीन नाही. निकृष्ट दर्जाच्या रस्त्यासाठी प्रसिद्ध होत चाललेल्या मंगरूळपीर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक निकृष्ट दर्जाच्या रस्त्याचा तुरा रोवला जात आहे. त्यामुळे यंत्रणेच्या नफेखोरीचा आणखी एक रस्ता बळी पडणार आहे की होत असलेला रस्ता हा उत्कृष्ट दर्जाचा आहे या शंकेला वाव आहे. सदर बाबी मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था यांचेच कार्यालयातून योग्य उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

# अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त झालेल्या व्याख्यानातून मिळाली हजारो पंढरपूरकरांना नवी ऊर्जा

## जयंती ही नाचायला नाही तर डोक्यात विचार करणारी साजरी केल्यामुळे अभिजीत पाटलांचे केले कौतुक : व्याख्याते संजय आवटे




**पंढरपूर/प्रतिनिधी**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त सुप्रसिद्ध व्याख्याते, पत्रकार संजय आवटे व व्याख्याते शिवाजी पवार यांच्या व्याख्यानास शिवतीर्थ, पंढरपूर येथे हजारो पंढरपूरकरांनी अहिल्यादेवींचा जाज्वल इतिहास जाणून घेतला.. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी तत्कालीन काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आजही देखील आश्चर्य वाटावे अशा सोयी-सुविधा अहिल्याबाईंनी रयतेसाठी निर्माण केल्या होत्या. हाती तलवार घेऊन लढा दिला. अहिल्याबाईंनी जाती-धर्मापेक्षा गुणवत्तेला महत्त्व दिले. जल व्यवस्थापन केले. अनेकांसाठी पानपोया उभारल्या. त्यांच्या कर्तृत्वाचा आणि सकारात्मक विचारांचा वारसा तुम्ही-आम्हीच जपला पाहिजे. कारण हा देश तुमच्या माझ्यासारख्या सर्वसामान्यांचा आहे. असे विचार त्यांनी आपल्या संबोधनातून व्यक्त केले.. हे व्याख्यान श्रोत्यांना निश्चितच पुढील जीवनासाठी विशेष प्रेरणा देणारे आणि दिशादर्शक होणारे ठरेल हा विश्वास विठ्ठल प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.यावेळी स्वेरीचे सचिव डॉ.बी.पी.रोंगेसर, मा. नगराध्यक्ष सुभाष भोसले, मा.नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर, नगरसेवक श्रीनिवास बोरगावकर, संतोष बंडगर, आनंद पाटील, विठ्ठल पाटील, संदीप मांडवे, पंकज देवकते, रायाप्पा हळणवर, प्रशांत घोडके, रामभाऊ गायकवाड, संतोष सर्वगोड, अण्णा महाराज भुसनर, विठ्ठल कारखान्याचे संचालक दिनकर चव्हाण, तुकाराम मस्के, धनाजी खरात, सिद्धेश्वर बंडगर, प्रवीण कोळेकर, तसेच सोमनाथ ढोणे, नितीन काळे, संजय लवटे, संतोष शेडगे, गणेश जाधव यांसह आदी मान्यवर उपस्थित होते...

# स्वराज्य पोलिस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटने तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान




**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना शाखा अक्कलकोटच्या वतीने लायन्स प्राथमिक शाळेच्या सभागृहात १९ गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनीचा सन्मान सोहळा संपन्न झाला.

संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष दीपक कांबळे व संस्थापक तथा राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेश शेवाळे तसेच विश्र्वस्त तथा महाराष्ट्र राज्य महिला संपर्क प्रमुख सौ. धनश्री उत्पात, विश्र्वस्त तथा महाराष्ट्र राज्य प्रसिध्दी प्रमुख उमेश काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर जिल्हा अध्यक्ष दिनेश काटकर यांच्या आदेशानुसार स्वराज्य चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी आयोजित केलेल्या सन्मान सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मान पत्र, मोत्याचा हार, महावस्त्र देऊन व पेढे भरवून सत्कार करण्यात आला.

संघटनेचे तालुका उपाध्यक्ष दिपक पोतदार यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर स्वराज्य चे तालुका अध्यक्ष व पत्रकार चंद्रकांत वेदपाठक यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीदेवी खूने होते. संघटनेची माहिती उमेश काशीकर व सोलापूर जिल्हा प्रवक्ता डॉ. श्रीकांत अंजुटगी यांनी मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले. पुणे एस. एस. सी. बोर्ड परीक्षेत मंगरुळे प्रशाला व तालुक्यात प्रथम क्र. उत्तीर्ण चि. आर्यन बारसकर, द्वितीय क्र. चि. संतोष तोळणूरे, तर इंडीयन मॉडेल स्कूल ची व तृतीय क्र. कु. आर्या गुळवे यांचा सत्कार करण्यात आला. मुलींमध्ये तृतीय कु. नंदिनी पवार, शहाजीची प्रथम कु. आर्या कुलकर्णी, द्वितीय कु. श्रेयस्वी कुंभार, तसेच द्वितीय क्र. हर्षवर्धन शितोळे, तृतीय कु. सौम्या देशपांडे , तृतीय क्र. कु.चैत्राली जोगदे, सुरेखा प्रशाले ची प्रथम क्रं प्रतीक्षा संभाजी सोलनकर, द्वितीय क्रं कु स्फूर्ती सोमन्ना खराडे, तृतीय क्रं लक्ष्मी चिकमळी, कन्या प्रशालेची प्रथम कु. सोनाली कालिराम, द्वितीय क्रं कु अलीशा चाबूकस्वार, द्वितीय क्रं कु संजना भडे तर तृतीय क्रं कु. मोसमिना चौधरी, आणि इंडीयन मॉडेल ची द्वितीय क्रं कु. अनुष्का पाटील, तृतीय क्रं चि. अथर्व मेणसे व चि. विनय कांबळे या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उमेश काशीकर, सोलापूर प्रवक्ताडॉ. श्रीकांत अंजुटगी, सोलापूर महिला जिल्हाध्यक्ष डॉ. धारा नीरज वोरा, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सत्तू भोसले, सोलापूर शहर संघटक सुनील ब्रेद्रे चंद्रकांत वेदपाठक, दिपक पोतदार, काशिनाथ पोतदार, दयानंद बिडवे, गौरीशंकर चनशेट्टी, बलभीम पवार, लायन्स शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीदेवी खुने, निलगार मॅडम व पालकाच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या प्रसंगी महिला, पुरुष पालक आणि शिक्षक प्रेमी उपस्थित होते.

# स्वेरीचा प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्ष हा विद्यार्थ्यांना योग्य दिशा देईल : प्राचार्य प्रा. चंद्रकांत ढोले

## स्वेरीत 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाचे' थाटात उदघाटन




पंढरपूर/प्रतिनिधीः 'ग्रामीण भागातील पालकांची व विद्यार्थ्यांची पुढील प्रवेशासाठी कोणतीही द्विधा स्थिती होऊ नये आणि पालक व विद्यार्थ्यांना प्रवेशासंदर्भात योग्य दिशा आणि अचूक माहिती मिळावी यासाठी स्वेरीच्या वतीने उघडलेल्या या मार्गदर्शन कक्षाचा बारावी उत्तीर्ण झालेल्या व उच्च शिक्षणाच्या प्रतिक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना १०० टक्के फायदा होणार आहे याचा मला विश्र्वास आहे. मी स्वेरीचे व डॉ. बी.पी. रोंगे सरांचे नाव खूप ऐकून आहे. तंत्रशिक्षण क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम सातत्याने व यशस्वीपणे करत असताना अनेक विद्यार्थ्यांना या उपक्रमांचा फायदा झाला आहे. माझ्या महाविद्यालयात शिकलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी पुढे स्वेरीमध्ये शिकून त्यांचे करिअर यशस्वी केले आहे. त्यामुळे राज्यातील अनेक ठिकाणचे विद्यार्थी स्वेरीत प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात. डॉ. रोंगे सरांचे व स्वेरीचे कार्य अभिमानास्पद व गौरवास्पद आहे. या सर्व कारणांमुळे स्वेरीतील हा मार्गदर्शन कक्ष विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य दिशा देवून करिअरसाठी लाभदायी ठरणार आहे.' असे प्रतिपादन अनगर (ता.मोहोळ) येथील कै.शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. चंद्रकांत ढोले यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी, थेट द्वितीय वर्ष (पदवी), पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी (एमटेक), एमबीए व एमसीए या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भातील सर्व माहिती एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने स्वेरीज् कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ॲटोनॉमस) मध्ये अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाची आज स्थापना करण्यात आली. या कक्षाच्या उदघाटन प्रसंगी प्राचार्य प्रा. चंद्रकांत ढोले मार्गदर्शन करत होते. प्रास्तविकात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील म्हणाले की, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बी.पी. रोंगे सरांनी १९९८ साली अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची चांगल्या कंपनीत अथवा प्रशासकीय क्षेत्रात कशी निवड होईल व उत्तम करिअर कसं घडेल या दृष्टीने सातत्याने प्रयत्न होत आहेत. प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे साहजिकच प्रत्येक वर्षी स्वेरीच्या यशाचा आलेख देखील उंचावत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अभियांत्रिकी, एमबीए व एमसीए या विद्याशाखांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी तसेच शैक्षणिक शुल्क, शासनाच्या विविध स्कॉलरशिप्स, विद्यार्थ्यांसाठी असणारी वसतिगृह सुविधा, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी असणारी कमवा व शिका योजना अशा विविध बाबीसंदर्भात चर्चा व मार्गदर्शन होण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या मार्गदर्शन कक्षात उच्चशिक्षित प्राध्यापक वर्गाची टीम सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सज्ज असणार आहे. यामुळे एकाच छताखाली सर्व अचूक माहिती मिळणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची आवड/ क्षमता, पालकांची निवड आणि प्राध्यापकांशी असणारा समन्वय/संपर्क या बाबी या प्रक्रियेत अत्यंत महत्वाच्या आहेत. स्वेरी संचलित अभियांत्रिकी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष, थेट द्वितीय वर्ष व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापासून ते प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रमाणपत्रे, त्यांची पडताळणी, शैक्षणिक पात्रता, प्रवेश घेताना तसेच महाविद्यालयांची निवड करताना विद्यार्थ्यांनी करिअरचा विचार करून नेमक्या कोण-कोणत्या महत्वाच्या बाबी पहाव्यात व तपासाव्यात, कॅप राउंडस्, कॅम्पस प्लेसमेंट, ब्रँचची निवड, मागील वर्षातील विविध विभागांचे कट ऑफ मार्क्स या व इतर संबंधित गोष्टींबाबत विद्यार्थी व पालक यांना योग्य व खात्रीशीर मार्गदर्शन या ठिकाणी मिळणार आहे.' स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ॲटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी 'प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन कक्षाची गरज का आहे? हे स्पष्ट करताना म्हणाले की, 'विद्यार्थी व पालकांचा अभ्यास, विचार आणि मानसिकता तसेच डिजिटल टेक्नोलॉजीचा विपरीत परिणाम होऊ नये व वस्तुस्थितीची जाणीव व्हावी. मनाचा गोंधळ उडू नये व करिअरच्या दृष्टीने एक ठोस निर्णय घेता यावा यासाठी या कक्षाची निर्मिती केली आहे. एकूणच बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेला हा मार्गदर्शन कक्ष विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना नक्कीच फायदेशीर ठरेल.' या संदर्भात अधिक माहितीसाठी मोबा. क्र. ९५९५९२११५४ व ८९२९१००६१४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या कक्षाच्या उदघाटन प्रसंगी डॉ.प्रशांत कुलकर्णी, प्रा.सोमनाथ ढोले, तज्ञ प्राध्यापक वर्ग व पालक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम विभागाचे प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# बोळेगाव येथे राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्सव साजरी

**वागदरी/एस.के.गायकवाड**


तुळजापूर तालुक्यातील बोळेगाव येथे राष्ट्रमाता पुण्याश्र्लोक अहिल्यादेवी होवळकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मौजे बोळेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी येथील मंदिरात असलेल्या अहिल्यादेवी होवळकर यांच्या मुर्तीचे पूजन गावचे तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश पाटील, श्रीशैल्य पाटील व अंगद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले तर येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच विलास पाटील, ग्रामसेवक एल.डी.कांबळे, उपसरपंच शांताप्पा मुलगे यांच्या हस्ते राष्ट्रमाता पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अहिल्यादेवी



यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी ॲड.अरूण सुर्यवंशी, सामाजिक कार्यकर्त्या संगीता सुरवसे,ग्रा.प.सदस्य सुनील सुर्यवंशी अंकूश रुपनूर, महादेव रूपनूर,राम हळणरे, सोसायटी चेअरमन महादेव काळे,युवा कार्यकर्ते सतीश सुर्यवंशी,सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी कार्याने भक्तगण प्रभावित : ना.आदिती तटकरे




**अक्कलकोट/प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या स्वामी कार्याने भक्तगण प्रभावित होत असल्याचे मनोगत राज्याचे महिला व बालकल्याण मंत्री ना.आदिती तटकरे यांनी व्यक्त केल्या.

त्या श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी मंडळाचे विश्र्वस्त संतोष भोसले, पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, शिवकुमार स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगाणुरे, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, गोटू माने, मल्लिकार्जुन बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती होणाऱ्यां समावेशा बद्दल; तथागत ग्रुप महाराष्ट्रात आक्रमक

**बुलढाणा/ राहुल साबळे**



तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने मेहकर येथे मा.तहसिलदार साहेब यांच्या मार्फत शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.संदिपभाऊ गवई यांच्या नेतृत्वाखाली मेहकर तहसिलदार साहेब यांना निवेदन सादर केले की, इयत्ता ३ री ते १२ वीचा पाठ्यक्रम शालेय अभ्यासक्रमात श्र्लोक आणण्याचे धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीमुक्ती क्रांतीचे मनुस्मृतीचे दहन शालेय अभ्यासक्रमात आण्यात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने धार्मिक अजेंडा राबवून मते मिळवण्यासाठी हिंदू राष्ट्राची भाषा असां, मनुस्मृतीतील श्र्लोक शालेय शिक्षणात आणण्याचे धोरण असो हे निंदनीय आहे. तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने तीव्र शब्दांत या धर्मसत्ताचा निषेध करत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गाडून टाकलेली मनूस्मृती जिवंत करण्याचा हा खोडसाळपणा आहे. स्त्रीमुक्तीच्ये आंदोलन उद्धस्त करण्याचा हा डाव आहे. स्त्रियांचे बहुजनांचे सामाजिक स्वातंत्र्य हिरावून धार्मिक हुकुमशाही रुजविण्याचा हा खेळ आहे. धर्मनिरपेक्ष भारतात शैक्षणिक क्षेत्रात एका धर्माचा उदो उदो योग्य नाही. संविधान बदलणार नाही म्हणायचं आणि श्र्लोक आणून संविधान बदलण्याच्या दिशेने वाटचाल करायची तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने मागणी करत आहे, जर शालेय शिक्षणात नवे बदल घडवायचे असतील तर महाड रायगडच्या पायथ्याशी जाळून टाकलेली मनूस्मृती दहन क्रांती अभ्यासक्रमात आणावी आणि येणाऱ्या पिढ्यांना या आधुनिक क्रांतीचे धडे दृयावेत, हाच नवा बदल आहे. तात्काळ श्र्लोक आणणारे धोरण रद्द करा आणि मनुस्मृती दहन क्रांती अभ्यासक्रमात समावेश करा अन्यथा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल अशा इशारा देण्यात आला आहे.

# जिल्हा परिषद शाळा टाकळीवाडी चे मुख्याध्यापक संजय दळवी गुरुजी हे सेवानिवृत्त

**पत्रकार नामदेव निर्मळे**



टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर चे कर्तव्यदक्ष व प्रामाणिक असे मुख्याध्यापक संजय दळवी गुरुजी हे १ जून रोजी सेवानिवृत्त झाले.

टाकळीवाडी या गावाशी त्यांची नाळ जुळलेली होती. प्रचंड अभ्यासू वृत्ती, संयमी, उत्कृष्ट नियोजन ,आदरपूर्वक विचारणा असे हे गुरुवर्य टाकळीवाडी शाळेला लाभले हे गावचे नशीब समजावे लागेल. विद्यार्थी असो किंवा पालक असो नेहमी योग्य मार्गदर्शन करणारे असे श्रेष्ठ गुरुवर्य आज सेवानिवृत्त झाल्याने अनेकांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले.

यांच्या कारकीर्दीत अनेक चांगले निर्णय झाले. अनेक निर्णय व अनेक योजना ची अंमलबजावणी सुद्धा होईल. ३६ वर्षे त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाची गंगा दिली. यांच्या काळात अनेक चांगले विद्यार्थी घडले. अनेक विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक,क्रीडा, स्पर्धेमध्ये शाळेचे नाव उज्वल केले.एक चांगली शिक्षकांची टीम या शाळेला लाभल.या सेवानिवृत्त कार्यक्रमाच्या वेळी गावातील आजी-माजी सैनिक, आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, आजी माजी सरपंच, उपसरपंच, विद्यमान सरपंच ,उपसरपंच, समस्त गावकरी, विद्यार्थी पालक उपस्थित होते.

# पंढरीतील दिव्या स्पोर्टस क्लबच्या विद्यार्थिनींचे मोठे यश

**पंढरपूर/प्रतिनिधी**





दिल्लीत यश मिळालेल्या खेळाडूंच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उद्योग व व्यापार प्रदेशाध्यक्ष नागेश (दादा) फाटे यांच्याकडून यथोचित सन्मान करण्यात आलापंढरपूर दिल्ली येथील नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत पंढरीतील दिव्या स्पोर्ट्स क्लब मधील विद्यार्थिनींनी मोठे यश संपादन केले आहे त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान केला आहेभारतीय खेल प्राधिकरणाच्या वतीने घेण्यात आलेल्या कराटे स्पर्धेमधून पंढरीतील विद्यार्थिनी सहभाग घेतला होता त्यामध्ये एकूण ११ मेडल पटकावले आहेत त्या मध्ये चार गोल्ड मेडल आणि सात ब्रांच

मेडल चा समावेश आहे या यशस्वी खेळाडू मधून समृद्धी कवडे प्रांजली वाघमारे शर्वरी सावळे सिया सातपाल या विद्यार्थिनींचा समावेश होता त्यामुळे दिव्या स्पोर्ट्स क्लबचे महेश गावडे सर यांच्यासह वरील विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला यावेळी मा एस एस शेट्टी सर मा सुशांत बागल मा विनय शिंदे मा संग्राम कापसे साहेब मा संतोष पुणेकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बुद्ध जयंती निमित्त वैशाख पौर्णिमेला बाबरगांव येथील नालंदा बुद्ध विहारात बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना

**गंगापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

गंगापूर तालुक्यातील बाबरगांव येथील नालंदा बुद्ध विहारात २५८७ व्या बुद्ध जयंती निमित्त वैशाख पौर्णिमेला बुद्ध मूर्ती बसविण्यात आली. याप्रसंगी गांवातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ग्रामपंचायत कार्यालय मार्गे नालंदा बुद्ध विहारापर्यंत ढोल ताशे व लेझीम पथकाचे सहाय्याने बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.



शेवटी नालंदा बुद्ध विहारात भंते रत्नबोधी आणि मान्यवरांच्या हस्ते बुद्ध मूर्ती बसविण्यात आली. तसेच पंचशील ध्वजाचा ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी बोलताना इंजिनिअर राजेश गायकवाड म्हणाले की, तथागताच्या महापरिनिर्वाणानंतर धम्माला जी चालना मिळाली ती प्रतीकांच्या आधारेच होय. आंबेडकरी चळवळ सर्वांगाने विकसित व्हावी म्हणून विहाराला जीवंतपणा आणला पाहिजे. धम्म रुजविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

मुक्तानंद कॉलेजचे डॉ. संदीप गायकवाड म्हणाले की, धम्म आणि धर्म यातील फरक समजून घेतला पाहिजे. माणसाने माणसाशी कसे वागावे? हे सांगणारे तत्त्वज्ञान म्हणजे धम्म होय.

याप्रसंगी दि आल इंडिया नाग असोसिएशन चे राष्ट्रीय कौन्सिल मेंबर बी. बी. मेश्राम म्हणाले की, आज जसे आपण बुद्ध मूर्तींच्या अनावरणासाठी सर्व जण एकत्रित आलो तसेच १९५५ ला ही वैशाख पौर्णिमा ६ मे ला होती. तेव्हा मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धानेच आवाहन केले आहे, असे सोपारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. बहुतांश धर्मात देव आणि ईश्र्वराचे अस्तित्व सांगितले आहे. पुजा-अर्चा, धूप-दीप, तंत्र-मंत्र, जप-तप, कर्मकांड या मार्गाचा अवलंब ईश्र्वर भक्तीसाठी केला जातो. ज्यांच्या मार्फत ईश्र्वराने धर्म सांगितला त्यांना प्रवर्तक मानले जाते. ईश्र्वर मानव संबंधात प्रवर्तकाची भूमिका पोस्टमन सारखी असते. या बाबी बुद्ध धम्मात नाकारलेल्या आहेत. उलटपक्षी सर्व बाबींची चिकित्सा करण्याची परवानगी देऊन बुद्धाने मानवी विवेकबुद्धीला आव्हान दिले आहे. बुद्धाने चिकित्सेनंतर सांगितलेले तत्त्वज्ञान हे रोगनिदानानंतर दिलेले औषध आहे. ज्यामुळे दुःख व दारिद्रय नष्ट करणाऱ्या पंचशील, अष्टांगिक मार्ग व दहा पारमितांचे आचरण केले तर क्रमशः अध्यात्मिक म्हणजे वैयक्तिक, आधिभौतिक म्हणजे सामुदायिक तर आधिदैविक म्हणजे नैसर्गिक दुःखाचा नायनाट केला जाऊ शकतो. करिता सम्यक दृष्टी आणि प्रज्ञा पारमिता विकसित करण्यासाठी अग्रक्रम दिला पाहिजे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत म्हटले आहे की, बुद्ध राज्य करी, जगावरी। त्याशी कारण एक, प्रचार प्रभावशाली। याचा विचार करून बुद्धाच्या विचारांचा वैज्ञानिक समाज निर्माण करण्यासाठी आपण बुद्ध विचारांचे प्रचारक आणि प्रसारक झाले पाहिजे. म्हणून आपण सर्वांनी बुद्ध समजून घेण्यासाठी केवळ रविवारीच नव्हे, तर दररोज बुद्ध विहारात गेलेच पाहिजे. म्हणजे मूर्ती को माला और विचारों को ताला। ही परिस्थिती संपुष्टात येईल.यावेळी प्रेम खाजेकर यांनी 'त्रिशरण पंचशीलाचे सुर जुळाले, भीमरायामुळे आम्हा बुद्ध मिळाले. तर लक्ष्मण तनपुरे यांनी 'गौतमा तुच या गुरूचा गुरू' हे गीत सादर केले. भंते रत्नबोधी यांनी धम्म देसना दिली. सुत्रसंचालन कडू कचरू तुपे, आभार रामनाथ तुपे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सरपंच शोभाताई लिंबोरे, उपसरपंच सोनाली ताई प्रदीप सावंत, माजी सरपंच सुनंदाताई दंडे, सदस्य दादासाहेब दंडे, नारायण सातपुते, रामनाथ जाधव, पोलीस पाटील यमुनाबाई, तुपे, दंडे, सावंत, पठाडे, सातपुते, थोरात, उबाळे, पवार, जाधव परिवारातील तरूण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत सेवानिवृत्त ईश्र्वर माशाळकर यांचा सत्कार



**अक्कलकोट/प्रतिनिधी**

श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत कार्यरत क्रीडाशिक्षक ईश्र्वर नामदेव माशाळकर ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती झाले.त्या पित्यर्थ संस्थेचे विश्र्वस्त शिवाचार्य रत्न श्री ष.ब्र. डॉ. सिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते स्वपत्नीक सत्कार करण्यात आले.उर्वरित आयुष्य सुख समृद्धी आनंददायी व आरोग्यदायी जावो हीच शुभेच्छा देऊन संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी,रुद्रमुनी हिरेमठ, योगीराज हिरेमठ,माशाळकर सरांचे सहकुटुंब व प्रशालेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर सेवक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोळ्ळे यांनी केले तर लाडाप्पा शिंदे यांनी आभार मानले.

# जैन समाजाच्या वतीने त्यागाची व राष्ट्रहिताची संस्कृती जपली जात आहे : श्याम उमाळकर




**बुलढाणा/ राहुल साबळे**

आज दिनांक १जून २०२४ रोजी जैन समाजाचे आचार्य श्री. महावीर समवरणजी यांचे जैन समाजाच्या वतीने मेहकर पावन प्रवास कार्यक्रम दत्त रेसिडेन्सी मेहकर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्ह्यातील खासदार,आमदार व अनेक मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास प्रमुख निमंत्रित म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर सुद्धा उपस्थित होते. यावेळेस त्यांच्यासोबत ड.रंगनाथ महाराज पितळे यांची उपस्थिती सुद्धा होती. सर्वप्रथम सर्व मान्यवरांनी आचार्य श्री.महावीर समवसरण यांचे दर्शन घेतले.यावेळी प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जैन समाज हा भगवान महावीर यांना मानणारा वर्ग असून या समाजाची त्यागाची संस्कृती आहे व या समाजाच्या माध्यमातून राष्ट्रीय दृष्ट्या आवश्यक असणारे अनेक विविध प्रकल्प संपूर्ण देशभरात कार्यरत असून या समाजातील अनेक लोक देशामध्ये खासदार,आमदार,मुख्यमंत्री अशा अनेक विविध प्रमुख पदावर कार्यरत असून त्यांची नाळ भगवान महावीरांसोबत जोडलेली असून त्यांची त्यागाची व राष्ट्रहिताची संस्कृती जपणारे महाराज श्री.महावीर समवसरणजी यांचे आज सारंगधर नगरी मेहकर मध्ये आगमन झाले असून त्यांच्या पावन पदस्पर्शाने संपूर्ण नगरी पावन झाली असे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ.अभय कोठारी ,मंगलचंद जैन, जयचंद भाटिया,सतीश बेगानी यांच्यासह,त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केले होते.या कार्यक्रमास मेहकर व लोणार तसेच इतर परिसरातील अनेक भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.